# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन,शासकीयदंतमहाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथामजला,सेंट जॉर्जेस रूग्णालयआवार, पी.डीमेलोरोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ८६५२२८१०२६

**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, and Mumbai-400 001
Website:www.msbnpe.org E-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- 8652281026


क्र. मराशुवपशिमं/ ९३०६ /२०२३ दिनांक:- १२/०६/२०२३

प्रति,
प्राचार्य/संस्थाप्रमुख,
सर्व मान्यता प्राप्त व संलग्नीत एल.एच.व्ही. नर्सिंग अभ्यासक्रम संस्था,
महाराष्ट्र राज्य

विषय : एल.एच.व्ही. नर्सिंग अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता विद्यार्थी नोंदणीबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व संलग्नीत संस्था/ प्राचार्य/ संस्थाप्रमुख यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेशित करण्याकरीता मंडळाच्या संकेतस्थळावर परिपत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे.

सर्व संस्थाप्रमुखांनी/ प्राचार्यांनी भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली आणि मंडळाच्या मानांकानुसार आवश्यक शैक्षणिक पात्रतेनुसार एल.एच.व्ही. नर्सिंग अभ्यासक्रमाचे विद्यार्थी प्रवेशित करणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेशित केलेल्या विद्यार्थ्यांच्या नोंदणीकरीता मंडळाच्या संकेतस्थळाच्या पोर्टलवर दि. १३/०६/२०२३ ते २०/०६/२०२३ पर्यंत रात्री १२.०० वाजेपर्यंत नोंदणी सुरु ठेवण्यात येत आहे. प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची अंतिम यादी दि. २०/०६/२०२३ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत मंडळाच्या ई-मेल enrollment3msbnpe2021@gmail.com वर पाठविण्यात यावी.

विद्यार्थी नोंदणी यादी मंडळाच्या ई-मेल वर प्राप्त न झाल्यास किंवा संकेतस्थळावर पोर्टलवर विद्यार्थी नोंदणी नाही झाल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसान व कायदेशीर बाबी करीता संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

for प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैदयक शिक्षण मंडळ